# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२१** **दि. २3 जून, २०२१**

(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)

-------------------------------------------------------

जळगाव दि.२३ ( ): जून/जुलै/ऑगस्ट, २०२१ (उन्हाळी) परीक्षेस बसलेल्या ज्या विद्यार्थ्यांनी कोरोनाच्या प्रादूर्भावामुळे आई अथवा वडील किंवा दोघेही गमावलेत अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने घेतला असून १५ जुलै पर्यंत महाविद्यालयांकडून संबंधित विद्यार्थ्यांचे प्रस्ताव मागविण्यात आले आहे.

काही विद्यार्थी संघटनांनी या बाबतीत विद्यापीठाला निवेदन दिले होते. प्रभारी कुलगुरु प्रा.ई.वायुनंदन यांनी सामाजिक बांधिलकीच्या नात्याने कोरोनामुळे पालकत्व हरवलेल्या विद्यार्थ्यांचे उन्हाळी परीक्षेचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना परिपत्रक पाठविण्यात आले आहे. या परिपत्रकात महाविद्यालये / परिसंस्था /प्रशाळांनी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांपैकी ज्यांचे आई अथवा वडील किंवा दोघेही कोरोना प्रादूर्भावामुळे मृत्युमुखी पडले असतील त्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव घ्यावेत. ज्या बँक खात्यात परीक्षा शुल्क जमा करावयाचे आहे त्या बँकेचे नाव व खाते क्रमांक, आई/वडीलांचे मृत्यु प्रमाणपत्र, परीक्षा शुल्क भरल्याची पावती अशी माहिती १५ जुलै पर्यंत परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागाकडे सादर करावयाची आहे असे या परिपत्रकात नमूद केले आहे.

## बातमी क्र.२

जळगाव दि.२३ ( ): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या २९ व्या दीक्षांत समारंभातील सुवर्णपदकाचे मानकरी ठरलेल्या विद्यार्थ्यांची सुवर्णपदके व प्रमाणपत्र संबंधित विद्यार्थ्यांना हस्तांतरीत करण्यासाठी महाविद्यालयांच्या प्राचार्य / परिसंस्थांचे संचालक/विद्यापीठ प्रशाळांचे संचालक यांना देण्यात आले असून त्यांनी संबंधित विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांशी संपर्क साधावा असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

कोरोना विषाणूच्या संसर्गाचा प्रादूर्भाव टाळण्यासाठी विद्यापीठाचा २९ वा दीक्षांत समारंभ दूरदृश्य प्रणाली (virtual mode) व्दारा दि. ३ मे, २०२१ रोजी आयोजित करण्यात आला होता. या समारंभात विविध अभ्यासक्रमाची सुवर्णपदके जाहीर करण्यात आली होती. सुवर्णपदक धारक विद्यार्थ्यांना सुवर्णपदके व प्रमाणपत्र देण्यासाठी महाविद्यालये/परिसंस्था/प्रशाळा यांच्या प्राचार्यांकडे

विद्यापीठाकडून हस्तांतरीत करण्यात आली असून हे सुवर्णपदके विद्यार्थ्यांना संबंधित महाविद्यालयाने द्यावयाची आहे.

तसेच गुणवत्ता यादीतील गुणवंत विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे देखील महाविद्यालयांना पाठविण्यात आली असून ती संबंधित विद्यार्थ्यांना देण्यात यावे अशा सूचनांचे पत्र सर्व संबंधित महाविद्यालये/परिसंस्था/प्रशाळा यांना देण्यात आले आहे. तेव्हा सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांशी सुवर्णपदक, सुवर्णपदक प्रमाणपत्र व गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी संपर्क करावा असे आवाहन विद्यापीठाचे संचालक, परीक्षा व मूल्यमापन संचालक यांनी केले आहे.

-----------------------------------------------------------------------------------------------------------

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या जळगाव, धुळे व नंदूरबार या तीन जिल्ह्याच्या आवृत्तीतून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी